भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

वाहन विभाग

दिनांक :- १५/१०/२४

प्रति,
संगणक विभाग प्रमुख
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

विषय :- **महानगरपालिकेचे वाहन क्र.एमएच-०४-एलक्यु-४४३९ (टाटा ४०७ डंपर) (मॉडेल सन २०२३) ची दुरुस्ती करणे बाबतची कोटेशन नोटीस मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये महानगरपालिकेचे वाहन क्र.एमएच-०४-एलक्यु-४४३९ (टाटा ४०७ डंपर) (मॉडेल सन २०२३) ची दुरुस्ती करणे बाबतची कोटेशन नोटीस मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी ही विनंती.

Choudhari

उप अभियंता (यांत्रिकी)
तथा वाहन विभाग प्रमुख
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

दिनांक :-१८/१०/२५

कोटेशन नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि.२८/१०/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा आधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोटेशन सादर करताना सोबत पॅन क्रमांक, वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय कर सादर करणे बंधनकारक आहे.

महानगरपालिकेचे वाहन क्र.एमएच-०४-एलक्यु-४४३९ (टाटा ४०७ डंपर) (मॉडेल सन २०२३) ची दुरुस्ती :- **स्टार्टर व अल्टरनेटरची ची दुरुस्ती :-** १) स्टार्टर व अल्टरनेटर दोन्ही खोलुन सर्व प्रथम स्टार्टर पुर्णपणे डिसमेंटल करणे. २) डिसमेंटल केलेले स्टार्टर चे सर्व पार्ट पेट्रोल ने स्वच्छ करुन सव्हिसिंग करणे. ३) स्टार्टर चे खराब झालेले पार्ट, बुश, कार्बन होल्डर, कार्बन सोलोनाईट स्वीच नविन फिट करुन स्टार्टर ची फिटींग करणे. ४) डिसमेंटल केलेले अल्टरनेटर चे सर्व पार्ट पेट्रोल ने स्वच्छ धुवून सव्हिसिंग करणे. ५) अल्टरनेटर च्या दुरुस्ती कामी डायलोट प्लेट, कट आऊट, कार्बन ब्रश, बेरींग नविन फिटींग करुन अल्टरनेटरची दुरुस्ती करणे. ६) नविन व्ही बेल्ट १ नग फिटींग करणे. ७) खराब झालेले डायवट प्लेट नविन फिट करुन अल्टनेटर ची पुर्ण दुरुस्ती करणे. **हब ग्रिसिंगची दुरुस्ती :-** चारही साईडचे टायर खोलुन ड्रम व एक्सल खोलुन सर्व जुने बेरिंग ऑईल सिल, ग्रीस, सरक्लीप बाहेर काढुन खराब झालेले पार्ट, बेरींग बाहेर काढुन त्याजागी स्टँडर्ड कंपनीचे बेरींग, ऑईल सिल, सरक्लिप, पॅकिंग फीट करुन योग्य प्रमाणात ग्रीस भरुन दुरुस्ती करणे. **पाटे (स्प्रिंग) आणि सस्पेशनची दुरुस्ती :-** सदर वाहनाचे मागील पाटयाचे बुश खराब झाले असुन पाटयाचे (स्प्रिंग) बेंड सरळ झाले आहे, तरी दोन्ही बाजुचे मागचे स्प्रिंगचे बुशपीन लॉक काढुन, यु-क्लॅम्प खोलुन पिन काढुन दोन्ही स्प्रिंग बाहेर काढणे, बुश सुध्दा बाहेर काढुन त्याजागी नविन बुश फिटींग करुन दोन्ही स्प्रिंगचे सेंटर बोल्ट कट करुन सर्व पाटे (स्प्रिंग) अलग करुन योग्य एंगलमध्ये स्प्रिंगला बेंड करुन मेन पाटयाला नविन बुशींग करुन दोन्ही बाजुचे स्प्रिंग पुन्हा फिट करुन नविन बुश पिन, लॉक फिटींग करणे, तसेच मागील दोन्ही शॉकअब्जर नविन फिट करणे, पुढील सस्पेंशन दुरुस्ती करिता दोन्ही बाजुचे सस्पेंशन काढुन स्वच्छ साफ करुन पुन्हा फिटींग करणे. **स्टेअरींगची दुरुस्ती :-** १) स्टेअरिंग बॉक्सचे दोन्ही हायड्रॉलिक पाईप खोलुन फॉऊंडेशनचे नट बोल्ट खोलुन बॉक्स बाहेर काढणे. २) बॉक्सला डिसमेंटलिंग करुन सर्व पार्ट डिझेल वॉश करणे. ३) बॉक्स मधील रॅक, पिनयन, ऑईल सिल, बेरींग बाहेर काढणे. ४) सर्व पार्ट चेक करुन खराब झालेले पार्ट बाहेर काढणे. ५) सर्व स्टेअरिंग बॉक्स दुरुस्ती कामी सर्व स्टँडर्ड कंपनीचे नविन पार्ट फिटींग करणे. ६) स्टेअरिंग फिटींग कामी नविन पॅकिंग सेट, ऑईल सिल, नविन फिटींग करुन बॉक्स जागेवर फिट करुन दोन्ही हायड्रॉलिक पाईप फिटींग करुन लेवल पर्यत ६८ ENKOL OIL भरुन AIR काढुन दुरुस्ती करणे.

उप अभियंता (यांत्रिकी)
तथा वाहन विभाग प्रमुख
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दिनांक१८/१०/२०२५
खालील ठिकाणी प्रसिद्ध केली.
१) मनपा संकेतस्थळ